# जाहिरात

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे आस्थापनेवर विधी अधिकारी वर्ग-ब व विधी अधिकारी यांची खालील पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर एकत्रित मासिक वेतनावर भरणेबाबत.

---

जा.क्र.कक्ष-१(२)/विधी अधिकारी/कंत्राटी पद भरती/२०२२ -८२ सोलापूर शहर, दिनांक १७-०१-२०२२.

---

खालील नमूद विधी अधिकारी - गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी नमूद अटी व पात्रता पूर्ण असलेला उमेदवारांकडून ११ महिन्यांकरीता पूर्णत: कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. **तसेच यापुर्वी दिनांक २०-१२-२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहीरात रद्द करण्यात येत आहे.** खालील दर्शविलेल्या पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**पदनाम, पदसंख्या व एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन + दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी (वर्ग-ब) | ०१ | रु. २५००० + ३०००/- |
| २ | विधी अधिकारी | ०२ | रु. २०००० + ३०००/- |

**सुचना :-**

१. विधी अधिकारी - गट ब व विधी अधिकारी या पदांसाठी करावयाचे अर्ज मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर गांधीनगर, नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर- ४१३ ००३ यांचे नांवे दिनांक २४-०१-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत वेळेत सादर करावीत.

२. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज परिपूर्ण भरुन व त्यासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती जोडून लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी - गट- ब पदासाठी अर्ज व विधी अधिकारी पदासाठी अर्ज असे नमूद करुन अर्ज दिनांक २४-०१-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयाचे पत्त्यावर पोहचतील याची दक्षता घ्यावी. यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

३. अर्जासोबत पत्रव्यवहार करणेकरीता उमेदवाराचा पत्ता असलेला एक लिफाफा जोडावा (पोस्टाचे तिकिट लावलेला)

४. अर्जाचा नमूना सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाचे **www.solapurcitypolice.gov.in** या सांकेतिक उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमूना डाउन लोड करुन अर्ज परिपूर्णरित्या भरावा.

५. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयात वरील मुदतीत हस्ते देखील अर्ज स्विकारले जातील.

**अटी व शर्ती :-**

१. विधी अधिकारी - गट -ब व विधी अधिकारी या पदांच नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.

२. सदर उमेदवारांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. सदर नेमणूका या करार पध्दतीने फक्त ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ०३ वेळा ११ महिन्यां करीता वाढविण्यात येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला समोरे जावे लागले.

४. निवड केलेले उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायांशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधीकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. उमेदवारांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल.
६. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर पत्राव्दारे / संकेतस्थळाव्दारे / एसएमएसव्दारे कळविण्यात येईल.
७. उमेदवाराला कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.
८. नियुक्ती केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा कारारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.
९. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय व दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.
१०. उमेदवाराने वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३१/१२/२०२१ अखेर पूर्ण करणे आवश्यक आहे.
११. अर्जासोबत २.५ + २.५ सेमी आकाराचे सध्याचे काढलेले ४ रंगीत फोटो जोडावेत. तसेच पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. (पोस्टाचे तिकीटासह)
१२. तसेच उमेदवाराची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकार हा निवड मंडळास राहील व तो सर्व उमेदवारांस बंधनकारक राहिल.

**करारातील मासिक देय रक्कम**

**अ)** विधी अधिकारी गट ब या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासिक देय रक्कम रु.२५,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रु.३,०००/- असे एकूण रु.२८,०००/- दरमहा देय राहिल. (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**ब)** विधी अधिकारी या पदाकरीता एकत्रित अनुज्ञेय मासिक देय रक्कम रुपये २०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रुपये ३,०००/- असे एकूण रुपये २३,०००/- दरमहा देय राहील. (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर काणेतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**विधी अधिकारी - गट - ब व विधी अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हता, व अनुभव**

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

१. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.
२. विधी अधिकारी गट-ब आणि विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकील व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल.
३. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**उमेदवाराचे वय-**

१. विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदारकीता उमेदवाराचे व नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक, कायद्याविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्ती बाबतच्या अन्य अटी लागू राहतील. **शासकीय सेवेत कार्यरत असणारी व्यक्ती निवडीस अपात्र असेल.**

**विधी अधिकारी गट-ब आणि विधी अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबीबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकश्या तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावायचे प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मुसदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमणूक दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

वरील रिक्त पदे हे शासनाने वेळोवेळी आदेशित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशित झालेले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवारांची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्पावार केव्हाही करण्याचे केव्हाही रद्द करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील.

**( डॉ.दिपाली धाटे )**
पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करीता

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

**"विधी अधिकारी (वर्ग-ब)" "विधी अधिकारी " अर्जाचा नमुना**

---

**विधी अधिकारी (वर्ग-ब) / विधी अधिकारी पदाकरीता अर्ज.**

कोणत्या पदाकरीता अर्ज (पदाचा स्पष्ट उल्लेख) ------------------------------

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१. अर्ज क्रमांक

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक

३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह)

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत जोडावा.

---

**सुचना - अर्जदाराने अर्जातील अंक इंग्रजीत लिहावेत. अर्जदाराने माहिती लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहती फक्त इंग्रजीत लिहावी. अर्जामधील माहिती सुस्पष्ट व सुवाच्छ अक्षरात लिहावी. आवश्यक नसेल तो मजकुर खोडावा .**

---

**अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :**

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत ..........................................................................................

इंग्रजीत

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ..............................................................................

तालुका ...................... जिल्हा ............................. पिनकोड ..........................

३) कायमचा पत्ता : ..............................................................................

तालुका ...................... जिल्हा ............................. पिनकोड ..........................

४) दुरध्वनी क्रमांक : लँडलाईन ......................... मोबाईल.........................

५) जन्म दिनांक :

| दिवस | | महिना | | वर्ष | | | | जन्म स्थळ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

६) दि.३१/१२/२०२१ रोजीचे वय :-

| दिवस | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

७) लिंग : पुरुष / महिला

८) धर्म : .............................. जात : .............................

९) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय :- होय / नाही
(योग्य असेल त्या ठिकाणी ✓ अशी खुण करावी.)

---

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

१०) शैक्षणिक अर्हता :-

| अ. क्र. | शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे दिनांक / वर्ष | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक शालांत परीक्षा (इ.१०वी) अथवा जुनी ११ वी परीक्षा | | | | | |
| २ | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२वी) | | | | | |
| ३ | पदवी | | | | | |
| ४ | विधी पदवी | | | | | |

११) इतर शैक्षणिक अर्हता :-
संगणक प्रशिक्षित आहात काय? : होय / नाही
(योग्य असेल त्या ठिकाणी ✓ अशी खुण करावी.)

१२) अर्जदाराची इतर माहिती :-
अ) सनद घेतल्याचा दिनांक ...............................
ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील :-

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा तपशील | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

टिप - वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री / श्रीमती / कु. ................................................................... याव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावण्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलीली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्ण जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबत माझ्याविरुध्द करण्यात येणा-या कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :- .........................

दिनांक :- ..........................                                        (अर्जदाराची सही)

सोबत :- अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती जोडल्या आहेत / नाहीत.

| | |
|---|---|
| १३-अ) अर्जदारास यापुर्वी कोणत्याही अपराधबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात/ दंड करण्यात/सिध्दोषी टरविण्यात आले आहे काय ? **किंवा** लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना/निवडींना वसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? किंवा अनर्ह टरविण्यात आले काय ? किंवा कोणत्याही विद्यापीटाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून परीक्षेस वसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? काढून टाकण्यात आले आहे काय ? | **होय / नाही** |
| १३-ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात / विद्यापीटात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकारात/ संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? | **होय / नाही** |

(१३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानवध्दता, दंड, दोषीसिध्द, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय, विद्यापीट/शैक्षणिक प्राधिकारात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)

---